महाराष्ट्र नागरी सेवा: मुंबई वित्तीय नियम १९५९ : प्रात्यक्षिक कार्य व सादरीकरण

(वेळ मर्यादा १७० मिनिटे)

प्रशिक्षणार्थींचे चार गट करणे.

(रोख पुस्तक तयार करण्यासाठी व्यवहाराचा तपशील - लेखा आक्षेपाची उदाहरणे)

१) गट क्र.(१) व (२) यांना रोख पुस्तक लिहिण्याबाबतचे उदाहरण देणे. रोख पुस्तकाचा विहित नमुना देऊन दिलेल्या उदाहरणाच्या आधारे रोख पुस्तक भरण्यास सांगावे.

२) गट क्र.(३) व (४) यांना लेखा परीक्षण आक्षेप देऊन त्यांचे अनुपालन तयार करण्यास सांगणे

महाराष्ट्र नागरी सेवा: मुंबई वित्तीय नियम १९५९

गट क्र. १ व २ साठी

रोख पुस्तक तयार करण्यासाठी साहित्य

दिनांक १५.१२.२०१६ ची आरंभीची शिल्लक

(१) वेतन :- रू.६०,३७०/-

(२) कार्या, खर्च :- रू.१,२०,४८०/-

दि.१५.१२.२०१६ रोजी

- कोषागार कार्यालयाकडून वेतनापोटी रू. २,६०,३४०/- प्राप्त झाले.
- दि. १५.१२.२०१६ रोजी श्री अबक यांनी पावती क्रं.२३२ अन्वये जमीन महसुलापोटी रू. १३,७६०/- जमा केले.
- दि. १५.१२.२०१६ रोजी कोषागार कार्यालयाकडून कार्यालयीन खर्चापोटी रू.४,३०,२३० प्राप्त झाले.
- दि. १५.१२.२०१६ रोजी रू. १,४०,३१०/- कर्मचाऱ्यांचे वेतन प्रदान केले.
- दि. १५.१२.२०१६ रोजी चलन क्र.१७ अन्वये रू. १३,७६०/- शासन खात्यावर जमा केले.
- दि. १५.१२.२०१६ रोजी मे.ओम फर्निचर्स यांना रू.४,३०,२३०/- प्रदान केले.
- दि. १६.१२.२०१६ रोजी कोषागार कार्यालयाकडून कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी रू. ३,३५,५५०/- प्राप्त झाले.
- दि. १६.१२.२०१६ रोजी श्री. क्षयज्ञ यांच्याकडून माहिती अधिकारांतर्गत झेरॉक्स खर्च रू. १६०/- पावती क्र.२३३ अन्वये प्राप्त झाला.
- दि. १६.१२.२०१६ रोजी कोषागार कार्यालयाकडून रू.८,२७०/- चा धनादेश कार्यालयीन खर्चापोटी प्राप्त झाले.
- दि. १६.१२.२०१६ रोजी रू.२,३५,७४०/- कर्मचाऱ्यांना वेतन प्रदान केले.
- दि. १६.१२.२०१६ रोजी रू.१६०/- चलन क्रं. १४० अन्वये शासन खाती भरणा केले.
- दि. १६.१२.२०१६ रोजी मे.चांदणी ट्रेडर्स यांना स्टेशनरी खरेदीसाठी रू.८,२७०/- प्रदान केले.

नांव ----------

विभाग ----------

रोख पुस्तक (विहित नमुना)

जमा खर्च

दिनांक		**वेतन रुपये**	**कार्यालयीन खर्च**	**एकूण रुपये**	**दिनांक**	**वेतन रुपये**	**कार्यालयीन खर्च रक्कम**	**एकूण रुपये**
		१	**२**			**१**	**२**	**३**
सुरुवातीची	शिल्लक				प्रमाणपत्र तपशील क्रमांक			
अ.क्रं.	तपशील							
एकूण जमा					एकूण खर्च			
एकूण बेरीज					शेवटची शिल्लक			
					एकूण बेरीज			

गट क्र. ३ साठी

नाव :-

पदनाम :-

लेखापरिक्षण आक्षेप

कॅश बुक प्रमाणक क्र. ८ अन्वये दिनांक १५/०६/२०११ रोजी मे.गुडविल क्रिएटर्स यांच्या नावे रु.२,६३,९५०/- एवढी रक्कम खर्च दाखविण्यात आली आहे. बिलाचे अवलोकन केले असता एकूण १० वस्तु खरेदी करण्यात आल्या आहेत असे दिसून येते.

पुन्हा तेच पुरवठाकार मे.गुडबिल क्रिएटर्स यांच्याकडून २० वस्तू खरेदी करुन प्रमाणक क्र.२७ दिनांक २०/०८/२०११ अन्वये रु.५,३७,३२८/- एवढी रक्कम खर्च दाखविण्यात आली आहे.

वरील दोन्ही पुरवठा आदेश एकाच निविदा प्रक्रियेमधून व एकाच पुरवठाकराला दिलेले असताना १० वस्तूंच्या खरेदीसाठी रु. २,६३,९५०/- एवढा खर्च आलेला असताना २० वस्तूंच्या खरेदीसाठी रु.५,२७,९००/- एवढा खर्च अपेक्षित होता. मात्र प्रत्यक्षात रु. ९,४२८/- एवढे अतिप्रदान झालेले दिसून येते. अतिप्रदानाची रक्कम वसूल करून चलनाने शासन जमा करण्यात यावी व चलनाची मूळ प्रत सादर करण्यात यावी.

गट क्र. ४ साठी

नाव :-

पदनाम :-

लेखापरिक्षण आक्षेप

कार्यालयाचे रोख पुस्तक तपासले तेव्हा प्रमाणक क्र. ३, दि.१३/०८/२०१२ अन्वये निवृत्त तहसिलदार श्री.अ.ब.क. यांना रजा रोखीकरणाची एकूण रक्कम रू.५,८४,२७०/- प्रदान केल्याचे दिसून येते. ही रक्कम त्यांना मा.जिल्हाधिकारी यांच्या दिनांक ५/८/२०१२ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आल्याचे दिसून येते.

मात्र दि.२०/१२/२०१२ रोजी पुन्हा प्रमाणक क्र. ७ अन्वये श्री.अ.ब.क. रजा रोखीकरण फरक म्हणून रू.१९२९०/- प्रदान केल्याचे दिसून येते.

म.ना.सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रं.६८(२) अन्वये "सेवा निवृत्तीच्या तारखेस अमलात असलेल्या दराने रोखीकरणाची रक्कम अंतिम प्रदान म्हणून एकाच वेळी एका ठोक रकमेत प्रदान केली जाईल" अशी तरतूद आहे. मात्र श्री. अ.ब.क. यांना रजा रोखीकरणाचे प्रदान दोन वेळा झालेले दिसून येते. दुसऱ्या वेळी प्रदान झालेली रक्कम रू.१९२९०/- हे अतिप्रदान आहे. ही रक्कम वसूल करून चलनाने शासन जमा करावी व चलनाची मूळ प्रत सादर करावी.